प्रकरण 2 रे

## तुकाराम समकालीन तुकाराम शिष्य आणि बहिणाबाई

---

तुकाराम महाराजांच्या भक्तीने आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाने अनेक लोक प्रभावित झाले होते. तुकाराम महाराजांचे शिष्यत्व काही मंडळींनी स्विकारलेले होते. परंतु तुकारामंनी स्वतःहून कोणाचे शिष्यत्व स्विकारले नाही किंवा कोणाचा शिष्यत्व म्हणून स्विकार केला नाही. परंतु त्यांच्या विठ्ठल भक्तीमुळे काही लोकांनी त्यांचे शिष्यत्व स्विकारले, त्याची साक्ष तुकारामांच्या प्रभावळीमध्ये दिसून येते. वारकरी संप्रदायात गुरूला अतिशय महत्व आहे.

"पराविद्येत गुरूपदेशाची महति विशेष मानली गेली आहे. ज्ञानविज्ञानात प्रत्यक्षानुभवानेच बुध्दीचे नियंत्रण सार्थ व परिणामकारक होते. बुध्दीच्या कल्पाविकल्पाला मुरड पडते आणि अगोचर व गूढ शक्तीसामर्थ्याची जाणीव होऊ शकते. हा परातत्वाचा उपदेश म्हणजे मंत्रोपदेश किंवा गूढ ज्ञानावरील शब्दावडंबर अशी भाबडी कल्पना अभिज्ञतेने समाजाच्या काही पातळीवर रूढ झालेली आहे. परातत्वाची जाणीव गुरू आपल्या अनुभवाने शिष्याला करून देतो. पराविद्येचा अभ्यासू ही जाणीव आपल्या सतत चिंतनमननाने व साधनसाहित्याच्या सहाय्याने अप्रत्यक्षपणे करून घेतो."[1] संत साहित्यामध्ये सुध्दा आपणास गुरू परंपरा पाहवयास मिळते. ज्ञानेश्वरांचे गुरू निवृत्तीनाथ हे होत. निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वरांच्या मस्तकावरती हात ठेवल्यानंतर त्यांना काव्यस्फूर्ती झाली. म्हणजे बोलविता धनी वेगळाची असा त्याचा अर्थ होय. ही प्रेरणाशक्ती ज्ञानेश्वरांना त्यांच्या गुरूकडून मिळाली. या प्रकरणाचा उद्देशदेखील हाच आहे की, तुकारामांचे गुरू कोण ? तुकाराम महाराजांनी कोणाचा शिष्य म्हणून स्विकार केला का ? त्यांच्या प्रभावळीत कोणाचा समावेश होतो. हा या प्रकरणाचा मुख्य हेतू आहे.

संत तुकाराम महाराजांनादेखील गुरूपदेश लाभला. त्याचे वर्णन त्यांनी एका अभंगामध्ये केलेले आहे.

"सत्यगुरूराये कृपामज केली । परी नाही घडली सेवा काही ।।
सापडविले वाटे जाता गंगास्नाना । मस्तकी तो जाणा ठेविला कर ।।
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ।।

काय केले उपजला अंतराय । म्हणोनिया काय त्वरा झाली ।।
राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण मालिकेची ।।
बाबजी आपुले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्णहरि ।।
माहो शुध्द दशमी पाहुनी गुरूवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।"[2]

तुकाराम महाराजांच्या या अभंगावरून असे स्पष्ट होते की, "बाबाजी चैतन्य" हे तुकारामांचे गुरू होत. बाबाजी चैतन्यांनी तुकाराम महाराजांना गुरूपदेश देताना 'रामकृष्णहरि' हा षडाक्षरी सोपा मंत्र दिला परंतु हा गुरूपदेश बाबाजी चैतन्यांनी प्रत्यक्षात दिला नाही तर स्वप्नामध्ये येऊन दिला. याची साक्ष त्यांच्या अभंगावरून पटते. तुकाराम महाराज गंगास्नानास जात असताना वाटेमध्ये बाबाजी चैतन्यांची भेट झाली. त्यांनी तुकोबांच्या मस्तकावर हात ठेवला. रामकृष्णहरि हा सोपा षडाक्षरी मंत्र दिला. गुरूदक्षिणा म्हणून बाबाजींनी पावशेर तूप मागितले. परंतु निद्रावस्थेत असल्यामुळे त्यांच्या हातून त्याची पूर्तता झाली नाही. मात्र त्यांनी बाबाजी चैतन्यांचा गुरू म्हणून अंगीकार केला.

बाबाजी चैतन्य हे तुकाराम महाराजांचे गुरू आहेत याचा दुसरा पुरावा असा की, तुकाराम शिष्या बहिणाबाई यांनी आपल्या पहिल्याच अभंगामध्ये गुरू परंपरा दिलेली आहे.

"आदिनाथे उपदेश पर्वतीशी केला । मच्छेंद्र ऐकिला मछगर्भी ।।
शिवहृदयाचा मंत्र पै अगाध । जालासे प्रसिध्द भक्तियोगे ।।
त्याने त्या गोरक्षा केले कृपादान । तेथोनि प्रकट जान गहेनी प्रति ।।
गहिनीने दया केली निवृत्तीनाथा । बाळपण आता योगरूप ।।
तेथोनि ज्ञानेश पावले प्रसाद । जाले ते प्रसिध्द सिध्दासनी ।।
सच्चिदानंदबाबा भक्तीचा आगर । त्याची अभयवर ज्ञान केला ।।
पुढे विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणे राघवी विचार ठेवलासी ।।
केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । जालेसे प्रसन्न तुकोबासी ।।
येकनिष्ठ भाव तुकोबाचे चरणी । म्हणोनी बहेणि लाधलेसी ।।"[3]

ज्या पध्दतीने बाबाजी चैतन्यांनी स्वप्नामध्ये येऊन गुरूपदेश दिला. त्याच पध्दतीने नामदेवांनी तुकारामांच्या स्वप्नामध्ये येऊन सांगितले की, आपण अभंगरचना करावी. असा उल्लेख तुकोबांनी एका

अभंगामध्ये केलेला आढळतो.

"नामदेवें केले स्वप्नामाजी जागे । सवे पांडुरंगे येऊनिया ।।
सांगितले काम करावे कवित्व । वाऊगे निमित्य बोलोनये ।।"[4]

**सारांश** : तुकाराम महाराज स्वतःहून कोणत्याही गुरूचा शोध त्यांनी घेतला नाही. त्यांना स्वप्नसाक्षात्काराद्वारे गुरूपदेश मिळाला. त्या गुरूचा अंगीकार त्यांनी केला. हे त्यांच्या अभंगावरून स्पष्ट होते.

**तुकाराम शिष्य :**

तुकारामांच्या अभंगामुळे आणि त्यांच्या विठ्ठल भक्तीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील लोक प्रभावित झालेले दिसून येतात. महाराजांना अनुसरणारी मंडळी त्यांच्या प्रभावळीत दिसतात. तसेच त्यांचे सोळा टाळकरी शिष्य होते. तुकाराम महाराजांच्या प्रत्येक कीर्तनाच्यावेळी ही मंडळी साथसंगत करीत असत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे –

1) महादजीपंत कुलकर्णी देहूकर, 2) गंगाराम मवाळ – तळेगावकर, 3) संताजी तेली जगनाडे – चाकणकर, 4) गवरशेठ वाणी बनिया – सुदुंब्रेकर, 5) मालाजी गाडे – येवलेवाडीकर, 6) मल्हारपंत चिकलीकर, 7) कोंडोपंत लोहोकरे – पुणेकर, 8) शिवबा कासार लोहगावकर, 9) नावजी माळी – लोहगावकर, 10) अंबाजीपंत कुलकर्णी – लोहगावकर, 11) कोंडा पाटील – खांदवेकर, 12) संत बहिणाबाई सिऊरकर, 13) रामेश्वरभट वाघोलीकर, 14) तुकयाबंधू कान्होबा, 15) कचेश्वर ब्रह्मे – चाकणकर, 16) निळोबाराय पिंपळनेरकर [5]

वरील सोळा टाळकऱ्यांची नावे प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास खंड – 3 यामध्ये दिलेली आहेत. परंतु निळोबाराय यांचा जन्म तुकाराम निर्याणानंतर झाल्यामुळे त्यांचा समावेश पहिल्या सोळा टाळकऱ्यांच्या मध्ये करता येत नाही, तर संपादक बाबुराव देवडीकर यांनी संपादित केलेल्या तुकारामांच्या गाथ्यात 'कान्होजी मोरे, सोनबा ठाकर'[6] यांचा पहिल्यां टाळकऱ्यांच्यामध्ये समावेश केला आहे. या टाळकऱ्यांनी तुकारामांचे शिष्यत्व पत्करले होते.

वरील टाळकऱ्यांनी तुकारामांचे शिष्यत्व पत्करले होतेच. त्याचबरोबर तुकारामांचे वाङमयीन शिष्यत्व पत्करणारी मंडळी होती. तुकारामांच्या प्रभावळीत यांचा उल्लेख आहे/माहिती आहे. त्यामध्ये तुकारामकन्या

भागुबाई हिचा समावेश केला आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे -

1) रामेश्वरभट वाघोलीकर, 2) तुक्याबंधु कान्होबा, 3) तुकारामकन्या भागूबाई, 4) संताजी तेली जगनाडे, 5) कचेश्वर ब्रह्मे चाकणकर, 6) निळोबाराय पिंपळनेरकर, 7) संत बहिणाबाई - सिऊरकर

या सर्वांनी तुकारामांच्या विठ्ठलभक्तीमुळे आणि त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्वामुळे प्रभावित होऊन त्यांना आपले गुरू मानले होते.

वरील सर्व शिष्यांनी तुकाराम महाराजांना आपले गुरू मानले होते. परंतु तुकोबांनी प्रत्यक्षात कोणासही अनुग्रह दिल्याचा किंवा गुरूपदेश दिल्याचा पुरावा आढळून येत नाही.

**1) रामेश्वरभट वाघोलीकर :**

रामेश्वरभटांचा जन्म इ.स. 1565-66 मध्ये झाला. रामेश्वरभटांना तुकारामांच्या जीवनातील एक खलपुरूष म्हणून ओळखले जाते. परंतु ज्ञानेश्वरांच्या स्वप्नसाक्षात्कारामुळे ते तुकारामांच्या भजनी लागले. रामेश्वरभट हे योगभ्रष्ट होते व योगसाधनेत त्यांनी आपले आयुष्य खर्च केलेले दिसते. त्यांचे तुकारामांच्या गाथ्यात आणि सकलसंतगाथेत अभंग रचना विखुरली आहे. नऊ अभंगापैकी दोन आरत्या आहे. 'आरती तुकारामा', 'तुकाराम तुकाराम' 'वैष्णवांची याती वाणी जो आपण' 'उदंड पाहिले देखिले ऐकिले' हे अभंग होत. ही अभंगवाणी तुकाराममय होऊन गेली आहे. तिला तुकारामांचा छंद जडला आहे. तुकारामांच्या श्रेष्ठत्वामुळे ती एवढी भारावून गेली आहे की, तुकारामंच्या स्वरूपात तिला परब्रह्माचा साक्षात्कार घडू लागला आहे. तुकोबांच्या अभंगाविषयक दिव्याची तुलना त्यांनी 'रहावे सागरात पाषाण तारियेले' या रामचरित्रातील घटनेशी केली आहे. तेही लक्षणीय आहे. या अभंगरचनेतील आत्मसमर्पनास 'हीनत्व आणणारे आत्मसमर्थन' म्हणून त्याची उपेक्षा किंवा अधिक्षेप करणे उचित ठरणार नाही. तुकारामांसाठीच त्यांची कविता जन्मास आली, ती तुकारामांच्यात रमली व ती तुकारामांस ओळखते. तुकारामांचा संप्रदाय, त्यांचे उपास्यदैवत, त्यांचा उपदेश या गोष्टीत तिला फारसे स्वारस्य नाही.

**सारांश :** रामेश्वरभट वाघोलीकर यांनी तुकारामांचे शिष्यत्व स्विकारले. त्यांनी अभंगरचनादेखील केली. परंतु तुकारामांच्या अभंगाचा, संप्रदायाचा, तत्वज्ञानाचा प्रभव त्यांच्या अभंगात दिसून येत नाही. तुकाराम महाराजांनी रामेश्वरभटांना प्रत्यक्षात गुरूपदेश केलेल्याचा पुरावा सापडत नाही.

**तुकयाबंधू कान्होबा :**

कान्होबा हे तुकयाबंधू म्हणून ओळखले जात असले तरी तुकारामांचा त्यांनाही अनुग्रह मिळाला नाही. तुकयाबंधूला अनुग्रह लाभला तो तुक्यामित्र म्हणविणाऱ्या 'गवरशेठ बनिया' या कानडा लिंगायत वाण्याचा, या घटनेचे आश्चर्य वाटते.

कान्होबांच्या नावावर गाथ्यात 97 अभंग दिले आहेत. तर 'सकलसंतगाथे' ते कान्होबाच्या नावावर 50 अभंग व दोन आरत्या आढळतात. कान्होबांच्या आत्मनिवेदनपर अभंगातून भावनिक आंदोलने मुलतःच कमी प्रमाणात जाणवतात आणि जी भावनिक आंदोलनातील सुसंवाद साधताना दिसत नाहीत. परिणामी तुकोबा व कान्होबा यांच्या अभंगरचनेचे प्रवाह स्वतंत्रपणे वाहू लागतात. ते समांतर नाहीत व सहसा परस्परांत गुंततही नाहीत. काही वेळा परस्परांना स्पर्श करतात असे वाटले तरी तो स्पर्श अर्थपूर्ण मात्र होताना दिसत नाही.

एवढेच नव्हे तर त्यांच्या स्फुट अभंगातून त्यांचे व्यक्तिमत्व फारसे प्रकटत नाहीत व त्यांच्या व्यक्तिमनाचे विशेषही प्रत्ययास येत नाहीत कारण कान्होबा जेव्हा पश्चातापदग्ध होऊन परमेश्वरास शरण जातात व अभंग निर्मिती करून आत्मनिवेदन करू लागतात. त्याप्रसंगीही ते स्वानुभवांची अभिव्यक्ती करण्याऐवजी स्वतःचे अधःपतित सर्व दुर्गुणयुक्त असे भडक चित्र रेखाटून स्वतःस दूषणे देऊ लागतात. परिणामी त्यांचे आत्मचरित्र अवास्तव व अतिरंजीत होऊ लागते.

**सारांश :** कान्होबा तुकाराम महाराजांच्या सहवासात राहूनदेखील त्यांना तुकारामांचा अनुग्रह लाभला नाही. त्यांना अनुग्रह लाभला तो गवरशेठ बनिया यांचा. तुकाराम महाराज आणि कान्होबा यांच्या अभंगाचे स्वरूप पाहिले तर हे स्वरूप पूर्णपणे वेगळे आहे हे त्यांच्या अभंगावरून स्पष्ट होते.

**तुकाराम कन्या भागूबाई :**

तुकाराम कन्या भागूबाई या तुकारामांच्या निर्याणाच्यावेळी अल्पवयीन होत्या त्यामुळे त्यांना प्रत्यक्षात अनुग्रह लाभणेच शक्य नाही. भागूबाईनी दोन अभंग रचलेले आहेत. त्यामध्ये विठ्ठल भेटीसाठी तिच्या मनाची तळमळ आणि दुसऱ्या अभंगामध्ये स्त्रीमनाचे चित्रण दिसून येते.

**संताजी तेली जगनाडे :**

संताजी तेली जगनाडे हे वस्तुतः तुकारामांची साक्षात्कारी प्रतिभा तुकाराम कीर्तनप्रसंगी जे अभंग उत्स्फूर्तपर्ण बोलून जात, ते शब्दांकित व संकलित करण्याचे एवढे महत्वाचे कार्य संताजींनी केलेले आहे. संताजी आणि तुकाराम यांच्या संवादाचे अभंग संताजीच्या नावावर आहेत. संताजीच्या अभंगाचे स्वरूप आणि तुकारामांच्या अभंगाचे स्वरूप प्रकृतीने वेगवेगळे आहे यात काही शंका नाही.

**सारांश** : संताजी तेली जगनाडे हे जरी तुकारामंच्या सहवासात राहिले त्यांच्या अभंगाचे लेखनिक म्हणून त्यांनी केले असले तरी प्रत्यक्षात त्यांना तुकाराम महाराजांच्याकडून त्यांना गुरूपदेश लाभला नाही.

**कचेश्वर ब्रह्मे :**

कचेश्वर ब्रह्मे चाकणकर यांचा जन्म इ.स. 1640–45 मध्ये झाला. कचेश्वर हे देहूस तुकारामांच्या मंदिरात आले. तेव्हा तेथे चाललेले नामसंकीर्तन ऐकत असता त्यांच्या मनाला एक अद्‌भुत व लौकिक असा साक्षात्कारानुभव आला. तुकाराममहाराजांनी आपल्या मस्तकावर हात ठेवल्याचा व आपणास आशिर्वादरूप अनुग्रह दिल्याचा भास होऊन कचेश्वरास आपल्या जीवनाची दिशा उमजल्याने धन्यता वाटली.

कचेश्वरांनी काही काव्य रचना केली आहे. त्यांचे 'अदिकथानुसंधान' म्हणजे कचेश्वरांच्या जीवनाचा पूर्वार्ध होय. परंतु त्यांचे आत्मचरित्र भावनिक पातळीपासून हे आत्मनिवेदन वंचित झाले आहे कारण बहिणाबाईप्रमाणे एखाद्या घटनेसंबंधीच्या अथवा प्रसंगासंबंधीच्या भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी ते कोठेही थांबलेले नाहीत. कचेश्वरांची अन्य कविता श्लोकबध्द असून ती कथात्मक स्वरूपाची आहे. त्यामुळे या कथात्मक श्लोकबध्द कवितेचे तुकारामांच्या कवितेशी कोणत्याही प्रकारचे नाते दर्शविता येत नाही.

**सारांश** : कचेश्वरांना तुकाराम महाराज यांचेकडून प्रत्यक्ष गुरूपदेश लाभला नाही. तसेच त्यांची कविता तुकारामांच्या अभंगाशी नाते न जोडता पंडिती काव्याशी जोडते.

**संत निळोबा :**

संत निळोबा हे तुकाराम निर्याणानंतर 15–20 वर्षांनी जन्मले. निळोबा व तुकाराम यांची प्रत्यक्ष भेट झाली नाही. ते पंढरपूर व आळंदीची वारी करत. यावेळी तुकारामसंबंधीत असणाऱ्या वारकऱ्यांच्या मनातील तुकाराम भक्तीने निळोबा प्रभावित झाले. त्यांचा छंद जडला तो इतका की तुकाराम विषयक भक्तीचे व

अखंड चिंतनाचे पर्यवसान अखेर साक्षात्कारात होऊन निळोबांना स्वतःला तुकारामांनी अनुग्रह दिल्याचे समाधान प्राप्त झाले. याचा उल्लेख त्यांनी 'मुख्य महाविष्णू चैतन्याचे मूळ । सांप्रदायफळ तेथोनिया ।' या आपल्या अभंगात केले आहे. प्रस्तुत अभंगात निळोबांनी 'निळा म्हणे मज उपदेश केला । सांप्रदाय दिला सकलजन' असे म्हटले असले तरी तुकारामांनी निळोबांना प्रत्यक्ष उपदेश दिल्याचे व त्यांच्याकडे सांप्रदायिक नेतृत्व सोपविल्याचे संभवत नाही.

निळोबांच्या अभंगाची संख्या दीडहजारावर आहे. यामध्ये श्रीकृष्णचरित्र, पंढरीमहात्म्य, देवाशी भांडण, देवभक्ताचा संवाद, चांगदेवचरित्र, तुकारामस्तुती, विरहिणी अशी वेगवेगळी रचना त्यांनी केलेली आहे. त्यांच्या अभंगामध्ये केवळ तुकारामांचीच नव्हे तर ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव आदी संतांच्या काव्यनिर्मितीची स्मृती जागविण्याचा साक्षेपी प्रयत्न केलेला दिसतो. यातील निळोबांची पाऊलवाट कोणती हे वेगळेपणाने सांगता येत नाही. निळोबा रूळलेल्या मार्गानीच जात आहेत. त्यांना नवी वाट शोधाविशी वाटत नाही. त्यामुळे वारकरी संप्रदायाच्या परंपरेत निळोबांची वेगळी काव्यधारा दर्शविता येत नाही. आत्मचरित्रपर, निर्याणपर, ब्रह्मपर अभंगरचनेमुळे बहिणाबाई स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करू शकली. निळोबांच्या अभंगगाथ्यातून मात्र त्याची एखादी प्रतिभा प्रकट होऊ शकलेली नाही. कधी ज्ञानेश्वरांच्या, कधी तुकारामांच्या तर कधी कान्होबांच्या सुरात सुर मिसळून त्यांची अभंगवाणी बोलत राहते. त्यामुळे त्यांच्या अभंग रचनेतून जाणवणाऱ्या अनुभूती व बहुवंशी उसन्या (सेकंडहॅण्ड) वाटत राहतात. त्या खऱ्या असू शकतील. निळोबांनी स्वतः त्या प्रामाणिकपणे अनुभवल्याही असतील. तथापि त्यांचे मूळ त्यांच्या अंतःकरणात नसते. विशेषतः तुकारामांच्या अंतःरंगातील भावसरीतेचे पाट निळोबांच्याकडे वळविले गेले आहेत. त्यामुळे त्यांच्या हृदयभूमीत आध्यात्मज्ञानाचे मळे बहरले असले तरी त्यांना टवटवीत ठेवणारे चैतन्याने मूळचे झरे वेगळेच असे वाटते.

**सारांश** : संत निळोबा हे तुकारामनिर्याणानंतरचे संत कवी त्यामुळे त्यांना प्रत्यक्ष गुरूपदेश मिळणे शक्य नाही आणि त्यांच्या अभंगवाणीला एक स्वरूपपणा आढळत नाही.

**संत बहिणाबाई :**

मराठीमध्ये आत्मचरित्र लेखन करणारी पहिली संतकवयित्री म्हणून बहिणाबाईचा उल्लेख करावा लागेल. बहिणाबाईचा जन्म शके 1551 मध्ये झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी एका तीस वर्षाच्या बिजवराशी

लग्न झाले. घरादाराचा त्याग केल्यानंतर कोल्हापूर स्थळी बहिणाबाईंना तुकाराम महाराजांचा स्वप्न साक्षात्कार झाला. बाबाजी चैतन्य आणि नामदेव हे जसे तुकाराम महाराजांचे स्वप्नस्थ गुरू तसेच तुकाराम महाराज हे संत बहिणाबाईंचे स्वप्नस्थ गुरू होते.

"तव अकस्मात सातवेयीदिनी । नामसंकीर्तन घोषयुक्त ।।
तुकारामरूपे येऊन प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळीजे ।।
ठेवूनिया कर मस्तकी बोलिला । मंत्र सांगितला कर्ण–रंध्री ।।
म्या ही पायावर ठेविले मस्तक । दिधले पुस्तक मंत्र गीता ।।
कार्तिक वद्य पंचमी रविवार । स्वप्नाचा विचार गुरूकृपा ।।"[7]

दुसरा स्वप्नसाक्षात्कार झाला तो ही कोल्हापूर स्थळी –

"तुम्ही आता येथे न राहो कदा । आत्मज्ञानबोधा न सांडावे ।।
बहिणे म्हणे दिल्हे दर्शन दुसरे । मनाच्या व्यापारे तुकोबाचे ।।"[8]

तेव्हा बहिणाबाई यांनी स्वप्नामध्येच तुकाराम महाराजांचा गुरू म्हणून अंगीकार केला याची साक्ष त्यांच्या दोन्ही अभंगावरून पटते. एक गोष्ट विशेषत्वाने जाणवते की, बहिणाबाईंना गुरूपदेश मिळण्याअगोदरच त्यांना तुकारामांचा छंद जडला होता.

बहिणाबाईंनी ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, जनाबाई यांच्या अभंगवाणीने प्रभावित होऊन त्यांच्या रचनेशी मिळतेजुळते असे बरेच अभंग रचलेले आहेत. एकनाथी 'तुळशीमहात्म्य' तसेच ब्राह्मणधर्मपर व ब्रह्मकर्मपर अभंगाशी नाते सांगणारी रचना बहिणाबाईंनी केलेली आहे. ज्ञानेश्वरांच्या अभंगाशी उघड उघड नाते सांगणारा अभंग असा –

"निश्चयाच्या भरी दिवस ना राती । प्रकाश न ज्योती कैसे माये ।।
हे सुख जाणती जाणवते स्वभावे । पूर्व कृपा देवे केली ज्यासी ।।
बिंबी बिंब कैसे सामावोनि ठेले । स्वरूप कोंदले दशदिशा ।।
बहिणी म्हणे तेथे बोलावे ते काय । मज मीच पाहे हरपले ।।"[9]

मात्र तुकारामांचा अभंग हाच शेवटी बहिणाबाईंच्या अखंड चिंतनाचा विषय झाला आहे. बहिणाबाईंनी तुकारामांच्या कितीतरी अभंगांचा उघडपणे अनुवाद केलेला आहे. यादृष्टिने पुढील अभंग अभ्यासनीय आहे. 'ज्याला प्रेतरूप शरीराचा भाव' 'आपले मरण पाहिले म्या डोळा' या तुकारामांच्या अभंगाच्या पार्श्वभूमीवर बहिणाबाईचा पुढील अभंग पहा –

"आपले आपण देखिले मरण । तो जाला शकुन स्वानंदासी ।।
उभारिली गुढी मनाच्या शेवटी । जाली मज भेटी आत्मारामी ।।
केला प्राणायाम सोंह धारणेसी । मिळाली ज्योतीशी ज्योत तेणे ।।"[10]

तसेच 'निंबाचिया झाडा साखरेचे आळे' किंवा 'पर्जन्य पडावे आपल्या स्वभावे' या तुकारामांच्या रचनेचे प्रतिबिंब पुढील अभंगात दिसून येते.

"निंबा कडुपण देत असे कोण । इक्षु गोडपण कोण करी ।।
बिजा ऐसे फळ गोडीचा निवाडा । हा अर्थ उघडा दिसतसे ।।"[11]

या व यासारख्या इतर अभंगात बहिणाबाई तुकारामांचे अनुभव स्वतःच्या शब्दात पुन्हा सांगताना दिसते. तिच्या इतर रचनेवरही तुकारामांच्या अभिव्यक्तिपध्दतीची दाट छाया पडलेली आढळते. येथे बहिणाबाई तुकारामांच्याच प्रतिमांचा उघडपणे उपयोग केला आहे ही गोष्ट विशेष महत्वाची वाटते.

**सारांश :** संत बहिणाबाई आणि तुकारामांची प्रत्यक्ष भेट झाली नसताना बहिणाबाईंना तुकारामांच्याकडून त्यांच्या भक्तीमुळे आणि तीव्र इच्छाशक्तीमुळे स्वप्नामध्ये येऊन तुकारामांनी गुरूपदेश दिला. तसेच तुकारामांच्या व्यक्तिमत्वाचा आणि अभंगाचा प्रभाव बहिणाबाईंच्या अभंगामध्ये इतर तुकाराम प्रभावळीतील शिष्यापेक्षा प्रकर्षाने जाणवून येतो. बहिणाबाईंनादेखील प्रत्यक्षात तुकारामांचा गुरूपदेश मिळाला नाही.

**समारोप :** तुकाराम महाराजांनी आपणहून कोणाचे शिष्यत्व स्विकारले नाही अथवा प्रत्यक्षात त्यांनी कोणाला गुरूपदेश दिला नाही. त्यांचे अनेक शिष्य होते. त्यामध्ये सात शिष्यांनी तुकारामांचे वाड.मयीन शिष्यत्व पत्करले होते. परंतु तुकारामांच्या अभंगांचा प्रभाव संत बहिणाबाई यांचा अपवाद वगळता इतर कोणावरही फारसा झालेला आढळून येत नाही.

* * *

## संदर्भ

1) संत तुकाराम - वा.सी. बेंद्रे, आ. 1 ली, पृ. 60

2) श्री संत तुकाराम गाथा - ल.रा. पांगारकर, आ. 1971, अभंग क्रं. 3086, पृ. 589

3) बहिणाबाईच्या गाथा - संपादिका - शालिनी जावडेकर, आ. 2 री, अ.क्रं.1, पृ. 195

4) पाच संतकवी - शं.गो. तुळपुळे, आ. 3 री, पृ. 343

5) प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास - खंड 3 - ल.रा. पांगारकर, आ. 1 ली

6) संत तुकारामांच्या गाथा - संपादक - बाबुराव देवडीकर, आ. 1 ली

7) संत बहिणाबाईच्या गाथा - संपादिका - शालिनी जावडेकर, आ. 2 री, अ.क्रं. 25, पृ. 214

8) संत बहिणाबाईच्या गाथा - संपादिका - शालिनी जावडेकर, आ. 2 री, अ.क्रं. 30, पृ. 218

9) तुकारामांची प्रभावळ - सुहासिनी इर्लेकर, आ. 1 ली, पृ. 61

10) तुकारामांची प्रभावळ - सुहासिनी इर्लेकर, आ. 1 ली, पृ. 61

11) तुकारामांची प्रभावळ - सुहासिनी इर्लेकर, आ. 1 ली, पृ. 62

* * *